महाराष्ट्र शासन
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, नागपूर

हायकोर्ट रोड, नागपूर-440 001

www.dvet.gov.in e-mail: jtdir.nagpur@dvet.gov.in Website. nagpur.dvet.gov.in/

क्रमांक : प्रा. का./नागपूर/२०१६/आस्था/बदली/DVEAADM8301/260522/029 / 482 दिनांक : 22 MAY 2026

**वाचा :**

१. महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन व शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५.
२. व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाचे कार्यालयीन आदेश क्र. ११/आस्था-२/बदली २०१६/६२५, दि.२६/०५/२०१६.
३. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०१७/प्र.क्र. ४१५/ कार्यासन १२, दि.०९/०४/२०१८.
४. कौशल्य विकास व उद्योजकता विभाग शासन निर्णय क्र.संकिर्ण- ११११/ प्र.क्र.२४/१९/व्यशि-५, दि.२०/०९/२०१९.
५. कौशल्य विकास व उद्योजकता विभाग शासन शुद्धीपत्रक क्र.संकिर्ण-११११/ प्र.क्र.२४/१९/व्यशि-५, दि.२७/०९/२०१९.

**कार्यालयीन आदेश :**

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन व शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ च्या अनुषंगाने कौशल्य विकास व उद्योजकता विभाग शासन निर्णय दि.२०/०९/२०१९ मधील तरतुदीनुसार व व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाचे कार्यालयीन आदेश दि.२६/०५/२०१६ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन गट-क संवर्गातील खालील कर्मचाऱ्याची बदली वर्ष २०२६-२७ मध्ये बदलीने पदस्थापना त्यांच्या नांवासमोर स्तंभ क्र.४ मध्ये दर्शविलेल्या संस्था/कार्यालयात पुढील आदेशापर्यंत करण्यात येत आहे.

| अ.क्र | कर्मचाऱ्याचे नाव | कार्यरत संस्था/कार्यालयाचे नाव | बदलीनंतर पदस्थापना केलेली संस्था/कार्यालय | पदनाम | व्यवसाय | बदलीचा प्रकार |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | ATUL ARUN DONGARWAR | Full Time Teacher (Practical)(+2 Level Bifocal)(Electrical Maintenance (A-1)) , Government Technical Highschool centre,and Junior College Tumsar Dist- Bhandara , Nagpur , Bhandara | Government Technical High School,Warora Nagpur , Chandrapur | Full Time Teacher (Practical)(+2 Level Bifocal) | (Electrical Maintenance (A-1)) | नियतकालिक बदली |

सदर बदली आदेशाची अंमलबजावणी करतांना खालील सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

१. या आदेशान्वये बदली झालेल्या कर्मचाऱ्यास कोणत्याही परिस्थितीत दि. ३१/०५/२०२६ (म.नं.) पर्यंत कार्यमुक्त करण्याची कार्यवाही संबंधित संस्था/कार्यालय प्रमुखांनी करावी. दि. ३१/०५/२०२६ (म.नं.) पर्यंत संबंधित संस्था/कार्यालय प्रमुखानी कर्मचाऱ्यास कार्यमुक्त न केल्यास दि. ३१/०५/२०२६ (म.नं.) रोजी सदर कर्मचारी त्याच्या सध्याच्या कार्यरत संस्था/ कार्यालयातून आपोआप कार्यमुक्त होईल.

२. बदली झालेल्या कर्मचाऱ्याचे त्याच्या सध्या कार्यरत असलेल्या संस्था/कार्यालयात जास्तीत जास्त दि. ३१/०५/२०२६ पर्यंतचे वेतन व भत्ते काढण्यात यावे. दि. ३१/०५/२०२६ नंतर सध्या कार्यरत असलेल्या संस्था/कार्यालयात कर्मचाऱ्याचे वेतन व व भत्ते काढण्यात येऊ नयेत. दि. ३१/०५/२०२६ नंतरचे वेतन व भत्ते त्याच्या सध्या कार्यरत असलेल्या संस्था/कार्यालयात काढल्यास त्यास सर्वस्वी संबंधित आंहरण व संवितरण अधिकाऱ्यास जबाबदार धरुन त्याचेविरुद्ध नियमानुसार शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल.

३. बदली झालेल्या कर्मचाऱ्यास त्याच्या पदाचा कार्यभार हस्तांतरण करण्याकरिता पर्यायी व्यवस्था संबंधित संस्था/कार्यालय प्रमुखांनी तात्काळ करावी. कार्यभार हस्तांतरीत न केल्यामुळे कर्मचाऱ्यास थोपवून धरल्यास त्यास सर्वस्वी संस्था/कार्यालय प्रमुखास जबाबदार धरुन त्याचेविरुद्ध नियमानुसार शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल. कार्यभार हस्तांतरीत करण्याची प्रक्रिया अपूर्ण असल्यास सध्या कार्यरत असलेल्या संस्था/कार्यालयप्रमुख यांनी कर्मचाऱ्यास प्रथम बदलीच्या संस्था/कार्यालयात रुजू होण्याकरिता कार्यमुक्त करावे व कर्मचारी बदलीने पदस्थापनका केलेल्या पदावर रुजू झाल्यानंतर संबंधित संस्था/कार्यालयप्रमुखांसोबत चर्चा करुन बदली झालेल्या कर्मचाऱ्याकडून कार्यभार हस्तांतरणाची प्रक्रिया पूर्ण करुन घ्यावी.

४. बदलीने पदस्थापना झालेल्या संस्था/कार्यालयात कर्मचारी रुजू होण्याकरिता आल्यास त्यास तात्काळ रुजू करुन घेण्यात यावे. रुजू करुन न

घेतल्यामुळे कर्मचाऱ्याच्या वेतन व भत्त्यांचा प्रश्न उद्भवल्यास त्यास सर्वस्वी संबंधित संस्था/कार्यालय प्रमुखास जबाबदार धरुन त्याचेविरुद्ध नियमानुसार शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल.

५. प्रशासकीय कारणास्तव बदली झालेल्या कर्मचाऱ्यांना नियमानुसार पदग्रहण अवधी व बदली प्रवास भत्ता अनुज्ञेय राहील. विनंतीने बदली झालेल्या कर्मचाऱ्यांना पदग्रहण अवधी व प्रवास भत्ता अनुज्ञेय राहणार नाही. कर्मचारी नियमानुसार अनुज्ञेय असलेला पदग्रहण अवधी उपभोगून बदलीने पदस्थापना झालेल्या संस्था/कार्यालयात हजर न झाल्यास त्याचेविरुद्ध महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ मधील तरतुदीनुसार शिस्तभंगविषयक कार्यवाही तात्काळ करण्यात येईल.

६. बदली झालेल्या कर्मचाऱ्याच्या मूळ सेवापुस्तकातील नोंदी अद्ययावत करुन मूळ सेवापुस्तक तसेच अंतिम वेतन प्रमाणपत्र बदली झालेल्या संस्था/कार्यालयास पाठविण्याची कार्यवाही बदली आदेशाच्या दिनांकापासून १ महिन्याच्या आंत पूर्ण करावी.

७. बदली ही संपूर्णपणे प्रशासकीय स्वरुपाची बाब असल्यामुळे बदली झालेल्या कर्मचाऱ्याने बदलीमध्ये बदल करण्याकरिता राजकीय दबाव वापरल्यास महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९८१ मधील नियम २३ चा भंग केला म्हणून ती कृती शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र राहील.

८. वरील अट क्र.१ व २ मध्ये कार्यमुक्तीबाबत निर्देश दिले आहे. तथापी, जनगणना कामी अधिग्रहित झालेल्या संबंधित कर्मचाऱ्यांच्या आदेशात (जनगणना आदेशात) नमूद केलेल्या कालावधीपर्यंत त्यांना बदलीच्या पदावर रुजू होण्यासाठी कार्यमुक्त करण्यांत येवू नये. सदर कालावधी संपल्यानंतर त्यांना तात्काळ कार्यमुक्त करण्यांत यावे.

सदरच्या बदली बाबतची यादी संचालनालयाच्या तसेच प्रादेशिक कार्यालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

सहसंचालक,
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण,
प्रादेशिक कार्यालय, नागपूर

प्रत माहिती व पुढील कार्यवाहीकरिता,

१. मा.संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. संबंधित संस्था/कार्यालय प्रमुख.
३. संबंधित कर्मचारी.
४. निवड नस्ती.